ARA/30-11-2023
Annexure - C

<u>प्रपत्र-क</u>

# व्यावसायीक अभ्यासक्रमातील प्रवेश मान्यतेची सध्याची कार्यपध्दती व मान्यता प्रदान करण्यात आलेली कार्यपद्धती

## <u>सध्याची कार्यपध्दती</u>

### १. प्रवेश नियामक प्राधिकरण बैठक व निर्णय

(१) अध्यक्ष,प्रनिप्रा यांनी बैठकिसमोरील विषय व बैठकिची तारीख दिल्यानंतर सर्व प्रनिप्रा सदस्य व बाकी संबंधिताना बैठक सूचना सचिव, प्रनिप्रा यांच्या मार्फत पाठविण्यात येते.

(२) बैठकीसाठी सदस्य Online/Offline पध्द्तीने उपस्थित राहू शकतात.

(३) आवश्यकतेनुसार बैठका घेण्यात येतात.

(४) बैठकिचे इतिवृत्त अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या मान्यतेने व स्वाक्षरीने सर्व सदस्य व संबंधितांना पाठविण्यात येते.

### २. निर्णयाची अंमलबजावणी

(१) बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सचिव, प्रनिप्रा स्तरावर अंमलबजावणी करण्यात येते.

(२) बैठकीचे इतिवृत्त शक्यतो लगतच्या पुढील बैठकीत मान्य करण्यात येते

(३) प्रवेश मान्यता यादी अध्यक्ष,प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने संबधिताना कळविण्यात येते.

### ३. पुनर्विलोकन याचिका

(१) प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने हितसंबंधित घटक पुनर्विलोकन याचिका सादर करतात

(२) पुनर्विलोकन याचिकांसदर्भात सुनावणीबाबत अध्यक्ष,प्रनिप्रा यांनी दिलेल्या तारीख व वेळेनुसार विद्यापीठनिहाय / विभागनिहाय / अभ्यासक्रमनिहाय / संचालकनिहाय याचिकाकर्त्यास सुनावणी घेऊन निर्णय देण्यात येतात.

(३) याचिकाकर्त्यास सुनावणीचा निर्णय मान्य नसल्यास याचिकाकर्ता फेरविचारार्थ अर्ज सादर करु शकतात.

(४) फेरविचारार्थ अर्जावर प्राधिकरण निर्णय घेते.

(J. R. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

## ४. नविन संस्थांचे नोंदणीकरण

(१) सध्यस्थितीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे स्वतंत्रपणे नोंदणीकरण करण्यात येत नाही.

(२) स्वतंत्र नोंदणी नसल्यामुळे शैक्षणिक वर्षनिहाय अभ्यासक्रमांची यादी अद्ययावत करता येत नाही. प्राधिकरणाचा निर्णय, प्रक्रीया शुल्काची येणे/देणे माहिति, प्राधिकरणाच्या निर्णयानुसार आकारण्यात आलेल्या दंडाची माहीती संस्थानिहाय अद्ययावत करता येते नाही.

(३) संस्थांचा संपर्कासाठी आवश्यक पत्ता, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी, प्रवेश क्षमता इ.माहीती उपलब्ध होत नाही.

## ५. अधिनियम २०१५, कलम १६ नुसार प्रक्रिया शुल्क आकारणी

(१) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सन २०१६-१७ मधिल निर्णयानुसार व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत प्राधिकरणाने वेळोवेळी सुधारणा करुन मान्यता दिलेल्या सुत्रानुसार महाविद्यालयातील उपलब्ध प्रवेश क्षमतेवर आधारीत प्रक्रियाशुल्क आकारणी करण्यात येते.

## ६. अधिनियम २०१५,कलम ९(५) ची तरतुद- प्रवेश मान्यता प्रस्ताव

(१) अधिनियम २०१५,कलम ९(५) च्या तरतुदीनुसार महाविद्यालय संबंधित संचालकांकडे प्रवेश तपासणीसाठी सादर करतात.

(२) प्रवेश प्रक्रियाशुल्काचा भरणा payment Gatway द्वारे करण्यात येते.

(३) प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांच्या तपासणी अहवालासह व भरणा केलेल्या प्रक्रिया शुल्काच्या पावतीसह Offline पध्दतीने सादर केले जातात.

(४) तंत्रशिक्षण,उच्च शिक्षण व कृषी शिक्षण संचालक महाविद्यालयांचे प्रवेश Online व Offline पध्दतीने तपासून अहवाल सादर करतात.

(५) वैद्यकिय, आयुष व कला शिक्षण संचालक महाविद्यालयांचे प्रवेश Offline पध्दतीने तपासून अहवाल सादर करतात.

(६) प्राप्त प्रवेश मान्यता प्रस्तावामधुन अभ्यासक्रमनिहाय १% प्रस्ताव प्राधिकरण स्तरावर पडताळणी करण्यात येतात.

(J. P. ...)
Admiss... Authority,
Maha... State

(७) महाविद्यालयांनी सादर केलेले प्रवेश मान्यता प्रस्ताव, संबंधित संचालकांचा तपासणी अहवाल व १% प्रस्ताव प्राधिकरण स्तरावर पडताळणी अहवाल याची एकत्रित माहीती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीत निर्णयासाठी सादर करण्यात येतात.

(८) प्राधिकरणाच्या निर्णय Online मध्ये अद्ययावत करुन बैठक तारखेनुसार मान्यतापत्रे Offline Print करुन अध्यक्ष,प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतात.

## ७. संचालकांशी समन्वय

(१) प्रवेश प्रक्रिया व प्रवेश मान्यता प्रक्रिया याबाबत संचालकांनी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

## ८. विद्यापीठांशी समन्वय

(१) प्रवेश मान्यता प्रक्रिया व विद्यापीठ पात्रता याबाबत विद्यापीठांनी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

## ९. मान्यता पत्रे निर्गमित करणे

(१) प्रवेश नियामक प्राधिकरण बैठकीत मान्यता दिलेल्या प्रवेशांना अध्यक्ष,प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने संबंधित महाविद्यालयांना मान्यता पत्रे देण्यात येतात.

(२) सदर मान्यता पत्रे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेनंतर उपलब्ध प्रवेशित माहिती व संचालक यांच्या तपासणी अहवालानुसार सेवा पुरवठादारांच्या मदतीने Online पद्धतीने प्रिंट करुन स्वाक्षरीसाठी सादर करण्यात येतात.

(३) स्वाक्षरी झालेली मान्यता पत्रे संबंधित महाविद्यालयांना स्पिडपोष्टद्वारे महाविद्यालयांच्या नोंदणीकृत पत्त्यावर (सेवा पुरवठादार यांनी पुरविलेल्या) पाठविण्यात येतात. तसेच मान्यता पत्राची प्रत संबंधित संचालक, विद्यापीठ, समाजकल्याण आयुक्त, इतर मागास व आदिवासी विभाग संचालक यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी पोष्टाद्वारे पाठाविण्यात येतात.

(४) दरम्यान प्रवेश मान्यतापत्रे संबंधित महाविद्यालयांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडी वर (सेवा पुरवठादार यांनी पुरविलेल्या) PDF format मध्ये पाठविण्यात येतात.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

# प्रस्तावित कार्यपध्दती

## १. प्रवेश नियामक प्राधिकरण बैठक व निर्णय

(१) अध्यक्ष, प्रनिप्रा यांनी बैठकिसमोरील बैठकिची तारीख व विषय दिल्यानंतर सर्व प्रनिप्रा सदस्य व बाकी संबंधिताना बैठक सूचना व विषय सचिव, प्रनिप्रा यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. बैठक सूचना किमान सात दिवस अगोदर संबंधितांना कळविण्यात येईल.

(२) बैठकीसाठी सदस्य प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील. अपवादात्मक परिस्थितीत दुरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित राहतील.

(३) आवश्यकतेनुसार बैठक घेण्यात येईल.

(४) बैठकीसाठी उपस्थित सदस्यांसोबत बैठक घेण्यात येईल. कोणीही सदस्य उपस्थित नसल्यास, अर्धा तास बैठक तहकुब करुन त्याच ठिकाणी बैठकीचे कामकाज करण्यात येईल.

(५) बैठकिचे विषय Offline/Online प्रोजेक्टरच्या माध्यमातून बैठकीसमोर सादर करण्यात येईल. बैठकीचे इतिवृत्त अध्यक्ष,प्रनिप्रा यांच्या मान्यतेने व स्वाक्षरीने सर्व सदस्य व संबंधितांना Online/Offline पद्धतीने पाठविण्यात येईल.

## २. निर्णयाची अंमलबजावणी

(१) बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सचिव, प्रनिप्रा स्तरावर अंमलबजावणी करतील व त्याचा कार्यवृतांत अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

(२) बैठकीचे इतिवृत्त शक्यतो लगतच्या पुढील बैठकीत सचिव,प्रनिप्रा मान्यतेसाठी सादर करतील.

## ३. पुनर्विलोकन याचिका

(१) प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने हितसंबंधित घटक पुनर्विलोकन याचिका प्राधिकरणाने नव्याने तयार केलेल्या Online प्रणालीद्वारे सादर करतील. काही परीस्थितीत पुनर्विलोकन याचिका Offline स्विकारण्यात येतील.

(J. P. Dange)
Chairman
Admission Regulating Authority,
Maharashtra State

(२) पुनर्विलोकन याचिका प्रकरणी प्राधिकरणाने नव्याने तयार केलेल्या Online प्रणाली पद्धतीनुसार पुनर्विलोकन याचिकांची पडताळणी, सुनावणीची तारीख, ठिकाण,सुनावणीचा निकाल,प्राधिकरणाची मान्यता इ. बाबी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेने करण्यात येतील.

(३) याचिकाकर्त्यास सुनावणीच्या निकालानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाने घेतलेला निर्णाय अंतिम राहिल.

## ४. नविन संस्थांचे नोंदणीकरण

(१) अधिनियम २०१५ मधिल तरतुदीनुसार प्रत्येक पात्र व्यावसायिक अभ्यासक्रामाच्या महाविद्यालयांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला स्वतंत्रपणे नोंदणीकरण करणे बंधनकारक राहील. अशा नोंदणीकृत संस्था केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेतील.

(२) स्वतंत्र नोंदणीमुळे शैक्षणिक वर्षनिहाय अभ्यासक्रमांची यादी अद्ययावत राहील. प्राधिकरणाचा निर्णय, प्रक्रीया शुल्काची येणे/देणे माहिती, प्राधिकरणाच्या निर्णयानुसार आकारण्यात आलेल्या दंडाची माहीती संस्थानिहाय अद्ययावत करता येईल.

(३) संस्थांचा संपर्कासाठी आवश्यक पत्ता, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी, प्रवेश क्षमता इ.माहीती उपलब्ध राहील.

## ५. अधिनियम २०१५, कलम १६ नुसार प्रक्रिया शुल्क आकारणी

(१) अधिनियम २०१५, कलम १६ मधिल तरतुदीनुसार प्रवेश मान्यता प्रक्रियेकरीता नोंदणीकृत महाविद्यालयांकडून प्रवेश नियामक प्राधिकरण प्रक्रिया शुल्क वसूल करेल.

(२) प्रक्रीया शुल्क आकारणीबाबत अधिनियमातील तरतुदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण दर शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला प्रक्रिया शुल्क आकारणी सुत्रास मान्यता देईल.

## ६. अधिनियम २०१५,कलम ९(५) ची तरतुद- प्रवेश मान्यता प्रस्ताव

(१) आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष हे प्रवेशित सर्व द्वारे (केद्रिभूत/केंद्रीभूत प्रक्रियेनंतर रिक्त जागांवरील प्रवेश,संस्थास्तरावरी प्रवेश,केंद्रीय कोट्यांतर्गत प्रवेश,अनिवासी भारतीय जागेवरील प्रवेश, केंद्र सरकार पुरस्कृत प्रवेश इ.) प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती व्यावसायिक अभ्यासक्रमनिहाय प्रवेश बंद दिनांकाच्या

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

(Cut-Off Date) दुस-याच दिवशी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडे Online पद्धतीने सुपुर्द करतील.

(२) प्रवेश बंद दिनांकाच्या (Cut-Off Date) नंतर प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती Online द्वारे संबंधित संचालकांना तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) संबंधित महाविद्यालये प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती Online पद्ध्तीने प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या नव्याने तयार केलेल्या संगणाक प्रणालीमध्ये Confirm करुन प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा payment Gatway द्वारे प्राधिकरणाकडे करतील.

(४) अधिनियम २०१५, कलम ९(५) च्या तरतुदीनुसार महाविद्यालय संबंधित संचालकांकडे प्रवेश तपासणीसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती आवश्यक कागदपत्रासह तपासणीसाठी सादर करतील.

(५) महाविद्यालयांनी सादर केलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती व आवश्यक कागदपत्रे तपासून त्याचा प्रमाणित अहवाल संचालक त्यांच्या Login मधुन Online अद्ययावत करतील व असा प्रमाणित केलेला अहवाल संबंधित महाविद्यालयांना Offline प्रमाणित करुन देतील.

(६) असे प्रमाणित प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांच्या तपासणी अहवालासह व भरणा केलेल्या प्रक्रिया शुल्काच्या पावतीसह Offline पध्दतीने प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

(७) अधिनियमातील कलम ९(५)(तीन) मधिल तरतुदीनुसार प्राप्त प्रवेश मान्यता प्रस्तावांची अभ्यासक्रमनिहाय छाननी प्राधिकरणाच्या आदेशानुसार करण्यात येईल.

(८) महाविद्यालयांनी सादर केलेले प्रवेश मान्यता प्रस्ताव, संबंधित संचालकांचा तपासणी अहवाल व प्राधिकरण स्तरावर केलेली छाननी अहवाल याची एकत्रित माहीती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीत Online/Offline स्वरुपात निर्णयासाठी सादर करण्यात येईल.

(९) प्राधिकरणाचा निर्णय Online मध्ये अद्ययावत करुन बैठकीच्या तारखेनुसार मान्यतापत्रे Online/Offline Print करुन अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतील.

## ७. संचालकांशी समन्वय

(१) वरील संपूर्ण प्रवेश प्रक्रियेमध्ये व प्रवेश मान्यता प्रक्रियेमध्ये संबंधित संचालकांशी समन्वय आवश्यक आहे.

(J. P. Dange)
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

(२) प्रवेश प्रक्रियेच्या व प्रवेश मान्यतेच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यकतेनुसार शासननिर्णय, मा. न्यायालयांचे आदेश, प्रवेश नियमांवली व Online प्रणाली याचे योग्य ते प्रशिक्षण देण्यात येईल.

## ८. विद्यापीठांशी समन्वय

(१) प्रवेश मान्यता प्रक्रिया व विद्यापीठ पात्रता याबाबत विद्यापीठांनी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

(२) प्रवेश पात्रतेबाबत सुसुत्रता रहावी या दृष्टीने विद्यापीठांनी समन्वय ठेवावा.

## ९. मान्यता पत्रे निर्गमित करणे

(१) प्रवेश नियामक प्राधिकरण बैठकीत मान्यता दिलेल्या प्रवेशांना अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीने संबंधित महाविद्यालयांना मान्यता पत्रे देण्यात येतील.

(२) सदर मान्यता पत्रे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेनंतर उपलब्ध प्रवेशित माहिती व संचालक यांच्या तपासणी अहवालानुसार प्राधिकरणाच्या बैठकीत मान्याता दिल्यानुसार अद्ययावत करुन Online पद्धतीने प्रिंट करुन अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीसाठी सादर करण्यात येतील. किंवा Digital signature करुन संबंधित महाविद्यालयंना त्यांच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येतील.

(३) सदरची प्रवेश मान्यता पत्रे संबंधित संचालक, विद्यापीठ यांना त्यांच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येईल. तसेच प्रवेश मान्यतेबाबत संबंधित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाचा निर्णय Online द्वारे कळविण्यात येईल.

(४) विद्यार्थी प्रवेश मान्यतेची माहिती शासनाकडे MAHADBT Portal साठी API द्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

******